MHRG110012992023

नि.दि.दा.क्र. ४१०/२०२३
(दर्शन बांदल वगैरे वि. किशोर शेलार)

## नियमित दिवाणी दावा क्र. ४१०/२०२३ मधील
## नि. २९ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मूळ दाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द निरंतरचे ताकिदीकरिता व तुर्तातुर्त ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी कथन केले की, वादी यांनी प्रतिवादी विरुध्द मौजे विळे, ता.माणगांव, जि.रायगड येथील सर्वे नं. २/१ या मिळकतीबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे वादीच्या मिळकतीमध्ये दि.२९.११.२०२३ रोजी बांधकाम करणेच्या उद्देशाने खोदकाम करुन लागले व दि.०६.१२.२०२३ रोजी दावा मिळकतीच्या ठिकाणी त्यांनी बांधकाम साहित्याची जमाजमव केली म्हणून वादी याने सदरचा दावा निरंतर ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी याने दावा मिळकतीमध्ये सुमारे ४२ x ५० फुट लांबी व रुंदीचे दीड फुट रुंद व दोन फुट उंची असलेले दगडी ज्योत्याच्या पायाचे बांधकाम केलेले आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम वादी यांच्या मालकीच्या दावा मिळकतीमध्ये केले असल्यामुळे ते हटवुन मिळणे व त्याकरिता वादीस दावा दुरुस्तीचा अर्ज देणे भाग पडले. सदरचे अतिक्रमण प्रतिवादी यांनी काढून न दिल्यास कोर्ट कमिशनर मार्फत सदर अतिक्रमण काढून जागेचा खुला ताबा देणेत यावा. प्रतिवादी यांनी केलेला बेकायदेशीर कृत्यामुळे वादीस प्रस्तुतचा दुरुस्त अर्ज देणेस भाग पडले आहे. त्या अनुषंगाने वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे. वादी यांच्या कथनानुसार सदर

दुरुस्तीमध्ये दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कसलाही बदल होत नाही. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये अंतिम निराकरण होणेचे दृष्टीकोनातून सदर दुरुस्ती होणे गरजेचे आहे. वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती होवुन मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन त्यांनी वादीच्या अर्जातील कथनास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा निरंतरचे ताकिदीकरिता दिला आहे. वादी सदरचा अर्ज देवुन पुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीची मिळकत कोठे आहे व कशी आहे याची माहिती वादीस नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासहित नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती मंजूर होवून मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र.१ व २ करीता –</u>

५. वादी व प्रतिवादींर्फे युक्तीवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये कोणतीही दुरुस्ती मंजुर करायची असेल तर न्यायालयाने जी बाब लक्षात घेणे महत्वाचे आहे ती बाब म्हणजे प्रस्तावित दुरुस्ती ही दोन्ही पक्षांमधील खरा वाद आहे त्या वादाच्या निकालासाठी आवश्यक आहे काय ?

७. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दावा दाखल केल्यानंतर दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने अतिक्रमण करुन वादीच्या मालकीच्या जागेवर बांधकाम केले व ते काढून मिळावे अशी दुरुस्ती होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार सदरचे अतिक्रमण हे दावा दाखल झाल्यानंतर झालेले असल्यामुळे त्याबाबत मागणी प्रस्तुत दाव्यात केली आहे. वादीने अतिक्रमित बांधकामाचे क्षेत्र नमूद केले आहे. त्यावर कोर्ट फीस स्टॅम्प देखील दिलेला आहे. वादीला दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटनांकरिता मजकूर वादी दाव्यात समाविष्ट करु शकतो. प्रस्तुतचा दावा हा सुनावणीकरिता प्रलंबित आहे परंतु आज तागायत साक्षीदाराचे शपथपत्र अभिलेखावर आलेले नाही. त्यामुळे वादी प्रतिवादीला सदर दुरुस्तीबाबत पुरावा देण्याची संधी उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीच्या कोणत्याही हक्कावर बाधा येत नाही.

८. वादीने सदरचा दावा हा निरंतर ताकिदीकरिता दाखल केला होता. सदर अर्जाद्वारे वादी अतिक्रमण काढण्याची मागणी समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. सदर मागणीमुळे दाव्याच्या स्वरुपावर कोणताही फरक पडत नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कसलाही बदल होत नाही.

९. संपुर्ण दाव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत दावा दाखल झाल्यानंतर मिळकतीबाबत घडलेल्या घटनेकरिता दाव्यामध्ये दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान भविष्यात निर्माण होणारे वाद एकाचवेळी संपुष्टात येतील. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी २९ वरील अर्ज वादीने प्रतिवादी यांना र.रु.१००/– खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.08.18 11:16:27 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-१४.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.